# सहकारी बँकांना सुधारणांचा बूस्टर !

**पुणे नागरी सहकारी बँकांचे अस्तित्व आगामी काळात काय असणार, याबाबत शंका व्यक्त केली जात असताना रिझर्व्ह बँकेने या बँकांचे चार प्रवर्ग केल्याने मोठा दिलासा मिळाला आहे. ठेवीदारांच्या हिताला सर्वोच्च प्राधान्य दिल्याने आणि छोट्या बँकांना सुधारण्यासाठी पाच वर्षांची संधी दिल्याने सहकारी बँकिंग क्षेत्राला बळकटी मिळणार आहे.**

**– संभाजी पाटील @psambhajisakal**

केंद्र सरकारने स्वतंत्र सहकार मंत्रालय तयार केल्यानंतर काय होणार?, याबाबतही अनेक तर्कवितर्क लढविण्यात आले. पण केंद्राच्या या मंत्रालयानंतर आणि महाराष्ट्रातील सहकारी बँकिंग क्षेत्राने आवाज उठवल्यानंतर रिझर्व्ह बँकेने नागरी सहकारी बँकांकडे पाहण्याचा आपला दृष्टिकोन बदललेला दिसतोय.

## बातमीपलीकडे

२००७ मध्ये नेमलेल्या विश्वनाथन समितीने सहकारी बँकिंगबाबत रिझर्व्ह बँकेला काही सुधारणा, शिफारशी सुचविल्या होत्या. त्यातील काही शिफारशी स्वीकारल्या आहेत. त्यानुसार आता देशातील नागरी सहकारी बँकांचे त्यांच्याकडील एकूण ठेवींनुसार चार प्रवर्गात वर्गीकरण केले आहे. यापूर्वी पाच कोटी रुपये ठेवी असणारी किंवा दहा हजार कोटींपेक्षा जास्त ठेवी असणारी बँक या सर्वांना एकच नियम होता. त्यामुळे एखादा नियम मोठ्या बँकाना उपयुक्त असेल तोच नियम छोट्या बँकांसाठी जाचक होत होता. यातून बँकिंग व्यवहार करणे आणि रिझर्व्ह बँकेचे सर्व नियम पाळून ठेवीदारांचे हित जपणे कठीण जात होते. मात्र नव्या दुरुस्तीनुसार पगारदार व १०० कोटींच्या आत ठेवी असणाऱ्या बँका, १०० कोटी ते एक हजार कोटी रुपये, एक हजार ते १० हजार कोटी रुपये आणि १० हजार कोटींच्या पुढे असणाऱ्या बँका असे चार प्रवर्ग केले आहेत. त्यांच्यावर नियंत्रणासाठी स्वतंत्र नियमावलीही प्रस्तावित करणार आहेत.

ठेवीदारांचे हित लक्षात घेऊन ज्या बँकांमध्ये जादा ठेवी, त्यांच्यावर अधिक लक्ष ठेवले जाणार आहे. तसेच छोट्या बँकांचे नेट वर्थ (नक्त मूल्य) कमीतकमी दोन ते पाच कोटी रुपये असणे आवश्यक केले आहे. ज्या बँका आपली आर्थिक क्षमता सुधारणार नाहीत त्यांना पाच वर्षानंतर दुसऱ्या सक्षम बँकेत विलीनीकरण किंवा लहान बँकांच्या एकत्रीकरणाचा पर्याय स्वीकारावा लागेल. सध्या देशातील २५० बँकांचे नेटवर्क निगेटिव्ह आहे. त्यांना पुढील पाच वर्षांत सुधारावे लागेल किंवा बँक बंद करावी लागेल. या दुरुस्तीचा सर्वात चांगला भाग असा, की गेली २० वर्षे बंद केलेले बँकिंग लायसन्स पुन्हा सुरू करणार आहे. पुण्यातील माजी खासदार अण्णा जोशी यांनी सुरू केलेली पुणे सहकारी बँक ही रिझर्व्ह बँकेची परवानगी मिळालेली शेवटची बँक होती. त्यानंतर देशात एकही बँकिंग परवाना दिला नव्हता. तो आता सुरू करण्यात येईल.

याशिवाय आर्थिकदृष्ट्या सक्षम असणाऱ्या बँकांना त्यांच्या सध्याच्या एकूण शाखांच्या १० टक्के इतक्या नवीन शाखा अथवा जास्तीत जास्त पाच शाखांना परवाना देण्याचा निर्णयही झाला आहे. त्यामुळे गेल्या शाखा विस्तारही होणार आहे. विश्वनाथन समितीने बोर्ड ऑफ मॅनेजमेंट ही संकल्पना रद्द करावी, अशी महत्त्वाची शिफारसही केली आहे, त्यावरही रिझर्व्ह बँकेने निर्णय घेणे अपेक्षित आहे. नागरी सहकारी बँकांकडे असणाऱ्या ठेवींची संख्याही पुन्हा वाढत आहे, या विश्वासाला नवीन नियमांमुळे बळ मिळेल.

### जिल्ह्यातील नागरी सहकारी बँका

- **एकूण बँका : ५१**
- **भागभांडवल : १२०७ कोटी**
- **ठेवी : ४६,१२२ कोटी**
- **गुंतवणूक : १५,६७७ कोटी**
- **सभासद : ९,४७,१६५**
- **ठेवीदार : ६१,९२,८०८**

NEWS PAPER NAME:- SAKAL
NEWS PUBLISHED DATE:- 25-07-2022
PAGE NO:- 04